महाराष्ट्र शासन

# प्राथमिक शिक्षण संचालनालय

डॉ.ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत,पुणे-४११००१.

दुरध्वनी : (०२०) २६०५४३१८ | दुरध्वनी : (०२०) २६१२५६९२

फॅक्स (०२०) २६१२८१५७/२६१२५८७४ | ई-मेल depmah2@gmail.com


जा.क्र./प्राशिसं/खाप्राशा/सेमी इंग्रजी/प्रस्ताव तपासणी/प्रशा-१ (५०१)/ 277 दि. जानेवारी, २०२५

27 JAN 2025

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व
शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद, सर्व
प्रशासन अधिकारी, महानगरपालिका, सर्व
शिक्षण निरीक्षक, सर्व

**विषय : बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार राज्यातील बिगर इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये (इ.१ ली ते ८ वी) सेमी इंग्रजी अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी देण्यासाठी कार्यवाही करणेबाबत.**

**संदर्भ :** १. महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २०११
२. शासन निर्णय क्र.सुप्राअ-२००४/(८/०४)/प्राशि-५, दि.१०.०२.२००४
३. शासन निर्णय क्र. सुप्राअ-२००४/(८/०४)/प्राशि-५, दि.२२.११.२००७
४. शासन निर्णय क्र.पीआरई-१७१३/(८६/१३/प्राशि-५, दि.१९.०६.२०१३
५. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३९७/टीएनटी-१, दि.०७.०२.२०१९
६. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३९७/टीएनटी-१, दि.२५.०२.२०१९

उपरोक्त विषयान्वये केंद्र शासनाने बालकाचा मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ पारित केला असून त्याची अंमलबजावणी दि.०१.०४.२०१० पासून राज्यामध्ये सुरू झाली आहे. त्याअनुषंगाने शासन निर्णय दि.१९.०६.२०१३ नुसार राज्यातील बिगर इंग्रजी माध्यमाच्या माध्यमांना शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ५ वीच्या विद्यार्थ्यांना गणित व इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना गणित व विज्ञान हे ऐच्छिक स्वरूपात इंग्रजी भाषेतून शिकविण्यास परवानगी देण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपल्या विभागामार्फत/कार्यालयामार्फत सेमी इंग्रजी मान्यतेसाठीचे प्रस्ताव शिक्षण संचालनालयास सादर करण्यात येतात. तथापि, सदर प्रस्तावांचे अवलोकन केले असता, त्यामधील बहुतांश प्रस्तावामध्ये असे निदर्शनास आले आहे की, सदर प्रस्तावाची उक्त शासन निर्णयातील तरतुदींनुसार तपासणी न करता किंवा आवश्यक ती कागदपत्रे सोबत न जोडता तसाच प्रस्ताव या कार्यालयामध्ये सादर करण्यात येतात. त्यामुळे सदर प्रस्तावाची संचालनामार्फत तपासणी केली असता, त्यामध्ये त्रुटी आढळून येत असल्याने सदर त्रुटींची पुर्तता करण्यासाठी आपणाकडे पुनश्च: पाठवावे लागत आहे.

सदर त्रुटींची पुर्तता करण्यासाठी परत पाठविण्यात आलेले बहुतांश प्रस्ताव संबंधित शाळा/संस्था यांना तातडीने आपणाकडून कळविण्यात येत नसल्याने संबंधित शाळा/संस्थांकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून संचानालयाकडे सदर प्रस्तावाबाबत विचारणा होत आहे. यावरून सदर प्रकरणी आपणाकडून तातडीने कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

तसेच सदरच्या त्रुटी संबंधित शाळा/संस्था यांना कळवून त्यांचेकडून त्या त्रुटींची पुर्तता विहीत वेळेत अथवा चालू शैक्षणिक वर्षामध्ये होत नसल्याने चालू शैक्षणिक वर्ष संपून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होते. आणि त्यानंतर सदरच्या त्रुटींची पुर्तता पुढील शैक्षणिक वर्षामध्ये संबंधित शाळा/संस्था यांचेकडून अथवा आपणाकडून या कार्यालयास सादर करण्यात येते, त्यामुळे ज्या शैक्षणिक वर्षामध्ये अंतिम त्रुटींची पुर्तता होते, त्या शैक्षणिक वर्षापासून सदर शाळेस सेमी इंग्रजी विषय शिकविण्याची परवानगी द्यावी लागत आहे.

वास्तविक पहाता आपले मार्फत परिपूर्ण प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह संचानालयास सादर न झाल्यामुळे त्यामध्ये त्रुटी आढळून येतात व सदर त्रुटींची पुर्तता त्याच शैक्षणिक वर्षात करण्याचे करण्याचे व सदर त्रुटींची पुर्तता त्याच शैक्षणिक वर्षात न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यालय, शाळा/संस्था यांची राहील याची जाणीव करून देण्याचे कळविण्यात येऊनसुद्धा सदर त्रुटींची पुर्तता विहित वेळेत अथवा त्या शैक्षणिक वर्षामध्ये होतांना दिसून येत नाही. ही बाब प्रशासकीयदृष्ट्या उचीत नाही.

सबब आता चालु शैक्षणिक वर्षामध्ये या कार्यालयामार्फत कळविण्यात आलेल्या पात्र/त्रुटी हया संबंधितांना कळविण्यात आल्या आहेत किंवा कसे याचा आढावा घेण्यात यावा व त्या संबंधित शाळा/संस्था यांना कळविण्यात आल्या नसल्यास तात्काळ कळविण्यात याव्यात. तसेच सदर प्रस्तावामध्ये आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता याच शैक्षणिक वर्षात करणे आवश्यक असल्याचे संबंधित शाळा/संस्थांना आपलेस्तरावरून निदर्शनास आणून देण्यात यावे व सदर त्रुटी पुर्ततेचे प्रस्ताव संचानालयास एक महिन्याच्या आत सादर करावे. यास विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी.

तरी यापुढे आपल्या कार्यालयास प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाची शासन निर्णय दि.१९.०६.२०१३ मधील अटी/शर्तीच्या होत किंवा कसे याबाबत आपलेस्तरावरून तपासणी करून परिपूर्ण प्रस्ताव या संचालनालयास सादर करावेत. तसेच सोबत जोडण्यात आलेल्या यादीतील कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव संचालनालयास सादर करण्यात यावेत.

(शरद गोसावी)
शिक्षण संचालक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य पुणे-१.

**बिगर इंग्रजी माध्यमाच्या शाळांना सेमी इंग्रजी मान्यता देण्यासाठी प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे**

| आवश्यक कागदपत्रे/अभिलेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| शाळा मान्यता आदेशाच्या सर्व प्रती | |
| चालु शैक्षणिक संच मान्यता, आरटीई मान्यता आदेशाच्या प्रती | |
| शाळा मान्यतेबाबत कसल्याही प्रकार वाद अथवा न्यायालयीन प्रकरण नसल्याचे हमीपत्र | |
| सदर शाळेस मंजूर शिक्षकांपैकी इंग्जी माध्यमातुन डी.एड. झालेले शिक्षक आहे काय, असल्यास त्यांची वैयक्तिक मान्यता व शैक्षणिक अर्हतेच्या प्रती सोबत जोडाव्यात. | |
| सदर शाळेत सेमी इंग्रजी विषय शिकविण्यासाठी शासन निर्णय दिनांक दि.०७.०२.२०१९ व दि.२५.०२.२०१९ नुसार उपलब्ध शैक्षणिक अर्हताधारक शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता व शैक्षणिक अर्हतेच्या प्रती | |
| सदर शाळेत गणित व विज्ञान विषय शिकविणाऱ्या शिक्षकाच्या वैयक्तिक मान्यता व शैक्षणिक अर्हतेच्या प्रती | |
| पालक - शिक्षक संघाचा ठरावाची प्रत (त्यासोबत वर्गनिहाय पालकाच्या स्वाक्षरी असलेली प्रत) | |
| सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यास शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक यांची शिफारस पत्र | |
| **हमीपत्र**<br>सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यासाठी कोणतेही अतिरिक्त अनुदान, अतिरिक्त शिक्षक, अतिरिक्त तुकडीची मागणी करणार नाही, तसेच सेमी इंग्रजी विषय शिकण्यासाठी विद्यार्थ्यांना/पालकांना सक्ती करणार नाही तसेच सेमी इंग्रजीबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे/अटीशर्तीचे पालन करू यावाबत संबंधित शाळा व संस्था यांचे हमीपत्र बॉडवर सादर करावे.) | |
| गणित/विज्ञान विषयाचे अध्यापन करण्यास इच्छुक असल्याबाबतचे शिक्षकाचे हमीपत्र. | |
| | |